श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## UG- 11.22 पंचम सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्रीकृष्ण तैयार ।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।
देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्

नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।
प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्

श्रीमद्भागवतमहापुराणम्

एकादशः स्कन्धः

॥ अथ द्वाविंशोऽध्यायः ॥

उद्धव उवाच
कति तत्त्वानि विश्वेश, सं(ङ्)ख्यातान्यृषिभिः(फ्) प्रभो ।
नवैकादश पं(ञ्)च त्रीण्- यात्थ त्वमिह शुश्रुम ॥ 1॥
केचित् षड्विं(म्)शतिं(म्) प्राहु- रपरे पं(ञ्)चविं(म्)शतिम्।
सप्तैके नव षट् केचिच्-चत्वार्येकादशापरे ॥ 2॥

केचित् सप्तदश प्राहुः(ष्), षोडशैके त्रयोदश।
एतावत्त्वं(म्) हि सं(ङ्)ख्याना- मृषयो यद्विवक्षया ।
गायन्ति पृथगायुष्मन्- निदं(न्) नो वक्तुमर्हसि ॥ 3॥

उद्धव म्हणाला – हे प्रभो! हे विश्वेश्वर! सांख्य ऋषींनी किती सांगितली आहे? आपण तर पुरुषोत्तम नऊ, अकरा, पाच आणि तीन म्हणजेच एकूण अठ्ठावीस तत्त्वे सांगितलेली ऐकली. काहीजण सव्वीस तत्त्वे सांगतात, तर दुसरे काहीजण पंचवीस. काहीजण सात, तर काहीजण सहा म्हणतात. काहीजण चार सांगतात, तर काहीजण अकरा. काहीजण सतरा, काहीजण सोळा, तर काहीजण तेरा सांगतात. हे सनातन श्रीकृष्णा! इतकी वेगवेगळी संख्या ऋषी कशी काय सांगतात? आपण कृपा करून ते आम्हाला सांगावे. (१-3)

श्रीभगवानुवाच

युक्तं(ञ्) च सन्ति सर्वत्र, भाषन्ते ब्राह्मणा यथा ।
मायां(म्) मदीयामुद्गृह्य, वदतां(ङ्) किं(न्) नु दुर्घटम् ॥ 4॥

श्रीभगवान म्हणाले – उद्धवा! यांविषयी वेद जाणणारे जे काही सांगतात, ते सर्व खरेच आहे. कारण सर्व तत्त्वे सर्वव्यापी आहेत. माझ्या मायेच्या आश्रयावर काय सांगणे असत्य आहे?

नैतदेवं(यँ) यथाऽऽत्थ त्वं(यँ), यदहं(वँ) वच्मि तत्तथा ।
एवं(वँ) विवदतां(म्) हेतुं(म्), शक्तयो मे दुरत्ययाः ॥ 5॥

"तुम्ही जे म्हणता, ते बरोबर नाही. मी जे सांगतो, तेच बरोबर." अशा प्रकारे जगाच्या कारणांसंबंधीचा वाद, सोडण्यास कठीण अशा त्रिगुणात्मक वृत्तीमुळे होतो. (५)

यासां(वँ) व्यतिकरादासीद्, विकल्पो वदतां(म्) पदम् ।
प्राप्ते शमदमेऽप्येति, वादस्तमनुशाम्यति ॥ 6॥

सत्त्व इत्यादी गुणरूप शक्तीच्या क्षोभामुळे, केवळ नाव-रूपात्मक मिथ्या प्रपंच उभा राहिला आहे. वाद-विवाद करणाऱ्यांच्या वादाचा हाच विषय आहे. जेव्हा इंद्रिये आपल्या ताब्यात येतात आणि चित्त शांत होते, तेव्हा त्यांची भेदबुद्धी नाहीशी होते आणि वादसुद्धा शांत होतो. (६)

परस्परानुप्रवेशात्, तत्त्वानां(म्) पुरुषर्षभ ।
पौर्वापर्यप्रसं(ङ्)ख्यानं(यँ), यथा वक्तुर्विवक्षितम् ॥ 7॥

हे पुरुषश्रेष्ठ! तत्त्वे एकमेकात प्रवेश करू शकतात, म्हणून तत्त्वांची जितकी संख्या वक्ता सांगू इच्छितो, त्यानुसार कारणे कार्यामध्ये किंवा कार्य कारणामध्ये मिळवून आपली इच्छित संख्या तो सिद्ध करतो. (७)

एकस्मिन्नपि दृश्यन्ते, प्रविष्टानीतराणि च ।
पूर्वस्मिन् वा परस्मिन् वा , तत्त्वे तत्त्वानि सर्वशः ॥ 8॥

एकाच कारणरूप तत्त्वामध्ये किंवा कार्यरूप तत्त्वामध्ये पूर्णपणे दुसरी तत्त्वे मिसळलेली दिसतात. (८)

पौर्वापर्यमतोऽमीषां(म्), प्रसं(ङ्)ख्यानमभीप्सताम्।
यथा विविक्तं(यँ) यद्वक्त्रं(ङ्), गृह्णीमो युक्तिसम्भवात् ॥ 9॥

यांची गणती जे जे करू इच्छितात, त्यांनी ज्या कार्याला ज्या कारणामध्ये किंवा ज्या कारणाला ज्या कार्यामध्ये अंतर्भूत करून तत्त्वांची जितकी संख्या स्वीकारली आहे, ते प्रतिपादन युक्तिसंगत असल्यामुळे आम्ही निश्चितपणे स्वीकारले आहे. (९)

अनाद्यविद्यायुक्तस्य, पुरुषस्यात्मवेदनम् ।
स्वतो न सम्भवादन्यस्- तत्त्वज्ञो ज्ञानदो भवेत् ॥ 10॥

जीव अनादी काळापासून अविद्येने युक्त असल्यामुळे तो स्वतःच स्वतःला जाणू शकत नाही. म्हणून त्याला आत्मज्ञान करून देण्यासाठी दुसऱ्या सर्वज्ञाची आवश्यकता आहे. अशा रीतीने प्रकृतीची चोवीस तत्त्वे, पुरुष आणि ईश्वर अशी ही सव्वीस तत्त्वे आहेत. (१०)

पुरुषेश्वरयोरत्र, न वैलक्षण्यमण्वपि ।
तदन्यकल्पनापार्था, ज्ञानं(ञ्) च प्रकृतेर्गुणः ॥ 11॥

या शरीरामध्ये असणाऱ्या जीव आणि ईश्वरामध्ये किंचितही भेद नाही. म्हणून त्यांना वेगळे मानू नये. ज्ञान हा सत्त्वगुणात्मक प्रकृतीचा गुण आहे. (अशा प्रकारे २४ जड तत्त्वे आणि एक चेतन पुरुष मिळून २५ तत्त्वे झाली.) (११)

प्रकृतिर्गुणसाम्यं(वँ) वै, प्रकृतेर्नात्मनो गुणाः ।
सत्त्वं(म्) रजस्तम इति, स्थित्युत्पत्त्यन्तहेतवः ॥ 12॥

तीन गुणांची साम्यावस्था हेच प्रकृतीचे स्वरूप आहे. म्हणून सत्त्व, रज आणि तम हे गुण प्रकृतीचेच आहेत, आत्म्याचे नव्हेत. हेच जगाची स्थिती, उत्पत्ती आणि प्रलय यांना कारण आहेत. (१२)

सत्त्वं(ञ्) ज्ञानं((म्) रजः(ख्) कर्म, तमोऽज्ञानमिहोच्यते ।
गुणव्यतिकरः(ख्) कालः(स्), स्वभावः(स्) सूत्रमेव च ॥ 13॥

या विवेचनात सत्त्वगुणच ज्ञान आहे, रजोगुण कर्म आहे आणि तमोगुण अज्ञान म्हटले गेले आहे. तसेच गुणांमध्ये क्षोभ उत्पन्न करणारा ईश्वरच काळ आहे आणि सूत्र म्हणजे महत्तत्त्व स्वभाव होय. (१३)

पुरुषः(फ्) प्रकृतिर्व्यक्त- महं(ङ्)कारो नभोऽनिलः ।
ज्योतिरापः(ह) क्षितिरिति, तत्त्वान्युक्तानि मे नव ॥ 14॥
श्रोत्रं(न्) त्वग्दर्शनं(ङ्) घ्राणो, जिह्वेति ज्ञानशक्तयः ।
वाक्पाण्युपस्थपाय्वङ्घ्रि- कर्माण्यं(ङ्)गोभयं(म्) मनः ॥ 15॥
शब्दः(स्) स्पर्शो रसो गन्धो, रूपं(ञ्) चेत्यर्थजातयः ।
गत्युक्त्युत्सर्गशिल्पानि, कर्मायतनसिद्धयः ॥ 16॥

पुरुष, प्रकृती, महत्तत्त्व, अहंकार, आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी ही नऊ तत्त्वे, ही अणूपासून भिन्नभिन्न आहेत. कान, त्वचा, डोळे, नाक तसेच जीभ ही पाच ज्ञानेंद्रिये, वाणी, हात, पाय, गुदद्वार आणि जननेंद्रिय ही पाच कर्मेंद्रिये. तसेच कर्मेंद्रिय व ज्ञानेंद्रिय उभयात्मक असणारे मन, अशी अकरा इंद्रिये आणि शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे ज्ञानेंद्रियांचे पाच विषय. अशा प्रकारे शरीर, मन, अहंकार आणि पाच विषय अशी सर्व मिळून अठ्ठावीस तत्त्वे होतांत. कर्मेंद्रियांच्या द्वारे होणारी, चालणे, बोलणे, मल-मूत्र-त्याग आणि काम करणे या पाच कर्मांमुळे तत्त्वांची संख्या वाढत नाही. यांना कर्मेंद्रियस्वरूप मानावे. (14–16)

सर्गादौ प्रकृतिर्ह्यस्य, कार्यकारणरूपिणी ।
सत्त्वादिभिर्गुणैर्धत्ते, पुरुषोऽव्यक्त ईक्षते ॥ 17॥

सृष्टीच्या प्रारंभी कार्य (अकरा इंद्रिये आणि पंचमहाभूते) आणि कारण (महत्तत्त्व इत्यादी) यांच्या रूपाने प्रकृतीच असते. तीच सत्त्वादी गुणांच्या क्षोभाने विश्व स्वतःमध्ये धारण करते. अव्यक्त परमात्मा या प्रकृतीचा फक्त साक्षी असतो. (17)

व्यक्तादयो विकुर्वाणा, धातवः(फ्) पुरुषेक्षया ।
लब्धवीर्याः(स्) सृजन्त्यण्डं(म्), सं(म्)हताः(फ्) प्रकृतेर्बलात् ॥ 18॥

महत्तत्त्व इत्यादी प्रकृतीचे कार्य व अहंकारादीकारण असणारे पदार्थ आदिपुरुषाच्या संकल्पामुळे शक्ती प्राप्त करून घेऊन एकमेकांत मिसळतात आणि प्रकृतीच्या साहाय्याने ब्रह्मांड निर्माण करतात. (18)

*सप्तैव धातव इति, *तत्रार्थाः(फ्) पं(ञ्)च खादयः ।
ज्ञानमात्मोभयाधा*रस् - ततो देहेन्द्रियासवः ॥ 19॥

उद्धवा! जे लोक तत्त्वांची संख्या सात मानतात, त्यांच्या विचारसरणीनुसार आकाश, वायु, तेज, जल आणि पृथ्वी ही पंचमहाभूते, सहावा जीव आणि सातवा परमात्मा होय. तो जीव व जग या दोघांचा आधार आहे. या सातांपासून देह, इंद्रिये व प्राण उत्पन्न होतात. म्हणून ते स्वतंत्र मानले नाहीत. (19)

ष*डि*त्यत्रापि भूतानि, पं(ञ्)च *षष्ठः(फ्) परः(फ्) पुमान् ।
तै*र्युक्त आत्म*सम्भूतैः(स्), सृष्ट्वेदं(म्) समुपाविशत् ॥ 20॥

जे फक्त सहा तत्त्वांचा स्वीकार करतात, ते असे म्हणतात की, पाच महाभूते आणि सहावा परमात्मा. तो परमात्मा आपण निर्माण केलेल्या पंचमहाभूतांनी युक्त होऊन देह इत्यादींची सृष्टी निर्माण करतो आणि त्यामध्ये जीवस्वरूपाने प्रवेश करतो. (20)

*चत्वार्येवेति *तत्रापि, तेज आपोऽन्नमात्मनः ।
जातानि तैरिदं(ञ्) जातं(ञ्), *जन्मावयविनः(ख्) खलु ॥ 21॥

काहीजण आत्म्यापासून तेज, जल आणि पृथ्वीची उत्पत्ती झाली आहे, म्हणून ही चारच तत्त्वे आहेत असे म्हणतात. कारण सर्व कार्यांचा जन्म यांच्यापासूनच आहे. (21)

सं(ङ्)ख्याने *सप्तदशके, भूतमात्रेन्द्रियाणि च ।
पं(ञ्)च पं(ञ्)चैकमनसा, आत्मा *सप्तदशः(स्) स्मृतः ॥ 22॥

काही लोक पंच महाभूते, पाच तन्मात्रा, पाच ज्ञानेंद्रिये, एक मन आणि एक आत्मा, अशी तत्त्वांची संख्या सतरा सांगतात. (22)

*तद्वत् षोडशसं(ङ्)ख्याने, आत्मैव मन *उच्यते ।
भूतेन्द्रियाणि पं(ञ्)चैव , मन आत्मा त्रयोदश ॥ 23॥

जे तत्त्वांची संख्या सोळा सांगतात, ते आत्म्यामध्ये मनाचाही समावेश करतात. जे लोक तेरा तत्त्वे मानतात, ते म्हणतात की, पाच महाभूते, पाच ज्ञानेंद्रिये, मन, जीवात्मा आणि परमात्मा. (23)

एकादशत्व आत्मासौ, महाभूतेन्द्रियाणि च ।

अष्टौ प्रकृतयश्चैव, पुरुषश्च नवेत्यथ ॥ 24॥

अकरा संख्या मानणारे पाच महाभूते, पाच ज्ञानेंद्रिये आणि एक आत्मा मानतात. काहीजण पाच सूक्ष्म भूते, मन, बुद्धी, अहंकार, पुरुष ही नऊ तत्त्वे मानतात. (24)

इति नानाप्रसं(ङ्)ख्यानं(न्), तत्त्वानामृषिभिः(ख्) कृतम् ।

सर्वं(न्) न्याय्यं(यँ) युक्तिमत्त्वाद्, विदुषां(ङ्) किमशोभनम् ॥ 25॥

ऋषींनी अशा प्रकारे निरनिराळ्या पद्धतींनी तत्त्वांची गणना केली आहे. सगळ्यांचे म्हणणे युक्तिसंगत असल्यामुळे उचितच आहे. नाहीतर विद्वानांना काय शोभत नाही ? (२५)

उद्धव उवाच

प्रकृतिः(फ्) पुरुषश्चोभौ, यद्यप्यात्मविलक्षणौ ।

अन्योन्यापाश्रयात् कृष्ण, दृश्यते न भिदा तयोः ॥26॥

उद्धव म्हणाला – हे कृष्णा ! जरी स्वरूपतः प्रकृती आणि पुरुष हे एकमेकांपासून सर्वथैव वेगळे आहेत, तरीसुद्धा ते एकमेकांमध्ये मिसळून गेल्यामुळे त्यांच्यामध्ये काही फरक दिसत नाही. प्रकृतीमध्ये पुरुष आणि पुरुषामध्ये प्रकृती आहे, असेच वाटते. (२६)

प्रकृतौ लक्ष्यते ह्यात्मा, प्रकृतिश्च तथाऽऽत्मनि ।

एवं(म्) मे पुण्डरीकाक्ष, महान्तं(म्) सं(म्)शयं(म) हृदि ।

छेत्तुमर्हसि सर्वज्ञ, वचोभिर्नयनैपुणैः ॥ 27॥

हे कमलनयना ! अशा प्रकारे यांची भिन्नता आणि अभिन्नता पाहून माझ्या अंतःकरणामध्ये फार मोठा संशय निर्माण झाला आहे. हे सर्वज्ञा ! आपल्या युक्तिसंगत वाणीने माझ्या या संशयाचे निराकरण करा. (२७)

त्वत्तो ज्ञानं(म्) हि जीवानां(म्), प्रमोषस्तेऽत्र शक्तितः ।

त्वमेव ह्यात्ममायाया, गतिं(वँ) वेत्थ न चापरः ॥ 28॥

भगवन ! आपल्याच कृपेने जीवांना ज्ञान होते आणि आपल्याच अविद्याशक्तीने त्यांच्या ज्ञानाचा नाश होतो. या आपल्या मायेचे हे स्वरूप आपणच जाणता. दुसरे कोणीही नाही. (२८)

श्रीभगवानुवाच

प्रकृतिः(फ्) पुरुषश्चेति, विकल्पः(फ्) पुरुषर्षभ ।

एष वैकारिकः(स्) सर्गो, गुणव्यतिकरात्मकः ॥ 29॥

श्रीभगवान म्हणाले – उद्धवा ! प्रकृती आणि पुरुष म्हणजेच शरीर आणि आत्मा या दोघांमध्ये फार फरक आहे. कारण गुणांच्या क्षोभाने सृष्टी उत्पन्न होते. म्हणून ती विकारांनी युक्त आहे. (२९)

ममाङ्ग माया गुणमय्यनेकधा
विकल्पबुद्धीश्च गुणैर्विधत्ते ।
वैकारिकस्त्रिविधोऽध्यात्ममेक-
मथाधिदैवमधिभूतमन्यत् ॥ 30॥

उद्धवा ! माझी माया त्रिगुणात्मिका आहे. तीच आपल्या गुणांनी अनेक प्रकारच्या भेदवृत्ती निर्माण करते. हिची कार्ये जरी अनेक असली तरीसुद्धा त्यांची अध्यात्म, अधिदैव आणि अधिभूत या तीन भागांमध्ये विभागणी केली जाते. (३०)

दृग् रूपमार्कं(वँ) वपुरत्र रन्ध्रे
परस्परं(म्) सिध्यति यः(स्) स्वतः(ख्) खे ।
आत्मा यदेषामपरो य आद्यः(स्)
स्वयानुभूत्याखिलसिद्धसिद्धिः ।
एवं(न्) त्वगादि श्रवणादि चक्षु-
र्जिह्वादि नासादि च चित्तयुक्तम् ॥ 31॥

जसा, डोळा अध्यात्म आहे, त्याचा विषय रूप हे अधिभूत आहे आणि डोळ्यांमध्ये असलेला अधिदैव अंश सूर्य आहे. हे तिघेही एकमेकांच्या आश्रयाने राहतात. परंतु आकाशातील सूर्य एक असून तो स्वतःसिद्ध आहे. तसाच आत्मासुद्धा तिन्ही भेदांचे मूलकारण असल्यामुळे एकरूप असून त्यांच्याहून वेगळा आहे. तो स्वयंप्रकाश असून आपल्या प्रकाशाने सर्व पदार्थांना प्रकाशित करतो. त्याचप्रमाणे त्वचा, कान, जीभ, नाक आणि चित्त इत्यादींचे सुद्धा तीन-तीन भेद आहेत. (३१)

योऽसौ गुणक्षोभकृतो विकारः(फ्)
प्रधानमूलान्महतः(फ्) प्रसूतः ।
अहं(न्) त्रिवृन्मोहविकल्पहेतुर्-
वैकारिकस्तामस ऐन्द्रियश्च ॥ 32॥

प्रकृतीपासून महत्तत्त्व आणि महत्तत्त्वापासून अहंकार उत्पन्न होतो. म्हणून हा अहंकार गुणांच्या क्षोभाने उत्पन्न झालेल्या प्रकृतीचेच कार्य आहे. अहंकाराचे तीन भेद आहेत, वैकारिक (सात्त्विक), तैजस (राजस) आणि तामस. हा अहंकारच अज्ञान आणि सृष्टीच्या विविधतेचे कारण आहे. (३२)।

आत्मा परिज्ञानमयो विवादो
ह्यस्तीति नास्तीति भिदार्थनिष्ठः ।
व्यर्थोऽपि नैवोपरमेत पुं(म्)सां(म्)
मत्तः(फ्) परावृत्तधियां(म्) स्वलोकात् ॥ 33॥

आत्म्याच्या अज्ञानामुळे तो आहे किंवा नाही, हा वाद आहे. पदार्थाविषयीची भेदबुद्धीही आत्म्याच्या अज्ञानामुळे आहे. हे सर्व अर्थशून्य असले, असमर्थही ज्ञानस्वरूप अशा मला हे लोक विमुख आहेत, त्यांचा हा वाद संपत नाही. (३३)

उद्धव उवाच
त्वत्तः(फ्) परावृत्तधियः(स्) , स्वकृतैः(ख्) कर्मभिः(फ्) प्रभो ।
उच्चावचान् यथा देहान् , गृह्णन्ति विसृजन्ति च ॥ 34॥

उद्धवाने विचारले — भगवन्! आपल्यामुळे विमुख असलेले जीव स्वतःच केलेल्या कर्मामुळे उच्च-नीच योनीमध्ये जात-येत राहतात. (३४)

तन्ममाख्याहि गोविन्द, दुर्विभाव्यमनात्मभिः ।
न ह्येतत् प्रायशो लोके, विद्वां(म्)सः(स्) सन्ति वं(ञ्)चिताः॥ 35॥

हे गोविंदा! ज्या लोकांना आत्मज्ञान नसते, त्यांना या विषयाची कल्पनाही करता येत नाही आणि जगात घडणारे लोक आपल्या मायेत गुंतल्यामुळे हे जाणत नाहीत. म्हणून आपणच मला याचे रहस्य सांगा. (३५)

श्रीभगवानुवाच
मनः(ख्) कर्ममयं(न्) नृणा- मिन्द्रियैः(फ्) पं(ञ्)चभिर्युतम्।
लोकाल्लोकं(म्) प्रयात्यन्य, आत्मा तदनुवर्तते ॥ 36॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले — मनुष्यांचे मन हे कर्म-संस्कारांचा समूह आहे. त्या संस्कारांनुसार भोग प्राप्त करून घेण्यासाठी ते मन पाच इंद्रियांसह एका शरीरातून दुसऱ्या शरीरात जात असते. आत्मा त्यापासून वेगळा असतानाही त्याचा अहंकार धरतो. त्यामुळे त्यालाही आपले जन्म-येणे भासू लागते. (३६)

ध्यायन् मनोऽनु विषयान्, दृष्टान् वानुश्रुतानथ ।
उद्यत् सीदत् कर्मतन्त्रं(म्), स्मृतिस्तदनु शाम्यति ॥ 37॥

कर्माच्या अधीन असणारे मन नेहमी या किंवा परलोकाशी संबंधित विषयांचे चिंतन करीत असते. जेव्हा ते नव्या विषयाचे चिंतन करते, तेव्हा ते पहिला विषय विसरते. त्यावेळी त्याची अगोदरच्या विषयांची स्मृतीसुद्धा नाहीशी होते. (३७)

विषयाभिनिवेशेन, नात्मानं(यँ) यत् स्मरेत् पुनः ।
जन्तोर्वै कस्यचिद्धेतोर् - मृत्युरत्यन्तविस्मृतिः॥ 38॥

नवीन देहाच्या विषयात तल्लीन झाल्यामुळे जीवाला पहिल्या देहाचे विस्मरण होते. कोणत्याही कारणाने आपल्या अगोदरच्या शरीराविषयी मुळीच आत्मीयता नसणे (किंवा त्याला पूर्णपणे विसरणे) म्हणजेच मृत्यू होय. (३८)

जन्म त्वात्मतया पुं(म्)सः(स्), सर्वभावेन भूरिद ।
विषयस्वीकृतिं(म्) प्राहुर् -यथा स्वप्नमनोरथः ॥ 39॥

हे उदार उद्धवा! मनुष्य जेव्हा नव्या शरीराचा पूर्णपणे आपलेपणाने स्वीकार करतो, तोच त्याचा जन्म होय. ज्याप्रमाणे स्वप्नामध्ये किंवा मनोरथ करताना माणूस नव्या शरीराला आपले म्हणून स्वीकार करतो. (३९)

स्वप्नं(म्) मनोरथं(ञ्) चेत्थं(म्), प्राक्तनं(न्) न स्मरत्यसौ ।
तत्र पूर्वमिवात्मान- मपूर्वं(ञ्) चानुपश्यति ॥ 40॥

नव्या स्वप्नामध्ये किंवा मनोरथ करताना पहिले स्वप्न किंवा मनोरथ जीवाला मुळीच आठवत नाही. त्याचप्रमाणे नव्या शरीराचा स्वीकार केल्यावर जीव आपण पूर्वीचे असूनही नव्यानेच उत्पन्न झालो आहोत, असे मानतो. (४०)

इन्द्रियायनसृष्ट्येदं(न्), त्रैविध्यं(म्) भाति वस्तुनि ।
बहिरन्तर्भिदाहेतुर्- जनोऽसज्जकृद् यथा ॥41॥

मनाच्या निरनिराळ्या देहांविषयीच्या अभिमानामुळे आत्म्याच्या ठिकाणी उत्तम, मध्यम व अधम असा नसलेलाच भेद उत्पन्न होतो. तसाच आत-बाहेर हा भेद उत्पन्न होतो. जसा दुष्ट पुत्राला जन्म देणारा पिता त्या मुलामुळे लोकांचा शत्रू किंवा मित्र बनतो. (४१)

नित्यदा ह्यं(ङ्)ग भूतानि, भवन्ति न भवन्ति च ।
कालेनालक्ष्यवेगेन, सूक्ष्मत्वात्तन्न दृश्यते ॥ 42॥

उद्धवा! काळाची गती सूक्ष्म असल्यामुळे क्षणाक्षणी प्राण्यांच्या शरीरांची उत्पत्ती आणि नाश होत असूनही ते दिसून येत नाहीत. (४२)

यथार्चिषां(म्) स्रोतसां(ञ्) च, फलानां(वँ) वा वनस्पतेः ।
तथैव सर्वभूतानां(वँ), वयोऽवस्थादयः(ख्) कृताः ॥ 43 ॥

काळाच्या प्रभावाने ज्याप्रमाणे दिव्याची ज्योत, नद्यांचे प्रवाह किंवा झाडावरील फळांच्या अवस्था बदलत असतात, त्याचप्रमाणे सर्व प्राण्यांच्या शरीरांचे आयुष्य, आरोग्य, अवस्था इत्यादीसुद्धा बदलत असतात. (४३)

सोऽयं(न्) दीपोऽर्चिषां(यँ) यद् - वत्स्रोतसां(न्) तदिदं(ञ्) जलम् ।
सोऽयं(म्) पुमानिति नृणां(म्), मृषा गीर्धीर्मृषायुषाम् ॥ 44 ॥

त्याच ज्योतीचा हा दिवा आहे, प्रवाहातील पाणी तेच आहे, असे समजणे आणि म्हणणे जसे खोटे आहे, त्याचप्रमाणे विषयचिंतनामध्ये आपले आयुष्य व्यर्थ घालविणाऱ्या अविवेकी पुरुषांचे तोच हा मनुष्य असे म्हणणे आणि समजणे सर्वथैव खोटे आहे. (४४)

मा स्वस्य कर्मबीजेन, जायते सोऽप्ययं(म्) पुमान् ।
म्रियते वामरो भ्रान्त्या, यथाग्निर्दारुसं(यँ)युतः ॥ 45 ॥

तो अविवेकी मनुष्यही वास्तविक कर्मबीजापासून उत्पन्न होत नाही की मरतही नाही. परंतु भ्रमामुळे आत्मा अमर असूनही त्याला तसे वाटते. जसा लाकडाशी संयोग झाल्याने अग्नी पेटतो किंवा वियोगाने विझतो असे वाटते. वास्तविक अग्नी नित्य आहे. (४५)

निषेकगर्भजन्मानि, बाल्यकौमारयौवनम् ।
वयोमध्यं(ञ्) जरा मृत्यु-रित्यवस्थास्तनोर्नव॥ 46 ॥

उद्धवा! गर्भाधान, गर्भवृद्धी, जन्म, बाल्य, कुमारावस्था, तारुण्य, प्रौढत्व, म्हातारपण आणि मृत्यू या नऊ अवस्था शरीराच्याच आहेत. (४६)

एता मनोरथमयीर्- ह्यन्यस्योच्चावचास्तनूः।
गुणसं(ङ्)गादुपादत्ते, क्वचित् कश्चिज्जहाति च ॥ 47 ॥

जीवापासून वेगळ्या असलेल्या शरीरांच्या या निरनिराळ्या काल्पनिक अवस्था आहेत. परंतु अज्ञानामुळे, गुणांच्या संगतीने आत्मा यांना आपले समजतो किंवा विवेक जागृत झाल्यावर त्यांना सोडूनही देतो. (४७)

आत्मनः(फ्) पितृपुत्राभ्या- मनुमेयौ भवाप्ययौ ।
न भवाप्ययवस्तूना -मभिज्ञो द्वयलक्षणः॥ 48॥

पित्याने पुत्राच्या जन्मावरून आणि पुत्राने पित्याच्या मृत्यूवरून आपापल्या जन्म-मृत्यूचे अनुमान करावे. जन्म आणि मृत्यू असणाऱ्या वस्तूंना जाणणारा आत्मा या दोन्ही लक्षणांनी युक्त असत नाही. (४८)

तरोर्बीजविपाकाभ्यां(यँ), यो विद्वां(ञ्)जन्मसं(यँ)यमौ ।
तरोर्विलक्षणो द्रष्टा, एवं(न्) द्रष्टा तनोः(फ्) पृथक् ॥ 49॥

झाडाचे बी आणि त्याची परिपक्वता पाहणारा माणूस त्यावरून त्याचा जन्म आणि विनाश पाहतो. या दोन्ही गोष्टी पाहणारा जसा झाडाहून वेगळाच असतो, तसा शरीराचे जन्म-मृत्यू पाहणारा सुद्धा शरीराहून वेगळा असतो. (४९)

प्रकृतेरेवमात्मान- मविविच्याबुधः(फ्) पुमान् ।
तत्त्वेन स्पर्शसम्मूढः(स्), सं(म्)सारं(म्) प्रतिपद्यते ॥ 50॥

अज्ञानी पुरुष, प्रकृती आणि आत्म्याचे हे वास्तविक रूप न कळल्यामुळे विषयभोगांनाच खरे सुख मानून त्यातच गुरफटून जातो आणि जन्म-मरणरूप संसार-चक्रात सापडतो. (५०)

सत्त्वसं(ङ्)गादृषीन् देवान्, रजसासुरमानुषान् ।
तमसा भूततिर्यक्त्वं(म्), भ्रामितो याति कर्मभिः ॥ 51॥

जेव्हा जीव आपल्या कर्मानुसार जन्म-मृत्यूच्या चक्रात भटकत असतो, तेव्हा सात्त्विक कर्मांच्या आसक्तीने ऋषी, देव या योनीमध्ये, राजस कर्मांच्या आसक्तीने मनुष्य, असुर या योनीमध्ये आणि तामस कर्मांच्या आसक्तीने भूत-प्रेत, पशु-पक्षी इत्यादी योनीमध्ये जन्म घेतो. (५१)

नृत्यतो गायतः(फ्) पश्यन्, यथैवानुकरोति तान् ।
एवं बुद्धिगुणान् पश्यन्- ननीहोऽप्यनुकार्यते ॥52॥

जेव्हा मनुष्य एखाद्याला नाचताना-गाताना पाहून स्वतःसुद्धा त्याचे अनुकरण करू लागतो, त्याप्रमाणे जीव स्वतः: निष्क्रिय असूनही बुद्धीच्या गुणांचे अनुकरण करू लागतो. (५२)

यथाम्भसा प्रचलता, तरवोऽपि चला इव ।
चक्षुषा भ्राम्यमाणेन, दृश्यते भ्रमतीव भूः ॥ 53॥

यथा मनोरथधियो, विषयानुभवो मृषा ।
स्वप्नदृष्टाश्च दाशार्ह, तथा सं(म्)सार आत्मनः ॥ 54॥

जलाशयामधील पाणी हलल्याने त्यात प्रतिबिंबित झालेली झाडेसुद्धा हालत असल्यासारखी दिसतात किंवा डोळे फिरविले असता पृथ्वीसुद्धा फिरताना दिसते किंवा जसे मनातील विचार अथवा स्वप्नात पाहिलेले पदार्थ सर्वथैव खोटे असतात, त्याचप्रमाणे, हे उद्धवा! आत्म्याचा विषयानुभवरूप संसारसुद्धा खोटा आहे. (५३–५४)

अर्थे ह्यविद्यमानेऽपि, सं(म्)सृतिर्न निवर्तते ।
ध्यायतो विषयानस्य, स्वप्नेऽनर्थागमो यथा ॥ 55॥

जशी स्वप्नातील अनर्थ-परंपरा ते पाहात असेपर्यंत नाहीशी होत नाही, त्याप्रमाणे विषय खरे नसूनही जो जीव त्यांचे चिंतन करीत राहतो, तोपर्यंत त्याचे हे संसार-चक्र थांबत नाही. (५५)

तस्मादुद्धव मा भुङ्क्ष्व, विषयानसदिन्द्रियैः ।
आत्माग्रहणनिर्भातं(म्), पश्य वैकल्पिकं(म्) भ्रमम् ॥ 56॥

म्हणून उद्धवा! या नाठाळ इंद्रियांनी विषयांचा उपभोग घेऊ नकोस. आत्म्याच्या अज्ञानामुळे भासणारा हा भेदभ्रम आहे, असे समज. (५६)

क्षिप्तोऽवमानितोऽसद्भिः(फ्), प्रलब्धोऽसूयितोऽथ वा ।
ताडितः(स्) सन्निबद्धो वा, वृत्त्या वा परिहापितः ॥ 57॥
निष्ठितो मूत्रितो वाज्ञैर्- बहुधैवं(म्) प्रकम्पितः ।
श्रेयस्कामः(ख्) कृच्छ्रगत, आत्मनाऽऽत्मानमुद्धरेत् ॥ 58॥

दुर्जनांनी धक्के मारून बाहेर हाकलले, अपमान केला, उपहास केला, निंदा केली, मारपीट केली, बांधून ठेवले, उपजीविकेचे साधन काढून घेतले, अंगावर थुंकले, मूत्र-विसर्जन केले किंवा निरनिराळ्या प्रकारे त्रास देऊन चित्त विचलित करण्याचा प्रयत्न केला किंवा अशा तऱ्हेचे कोणतेही संकट असले, तरी ज्याला आपले कल्याण करून घेण्याची इच्छा आहे, त्याने आपल्या विवेकबुद्धीने त्या अडचणींपासून स्वतःचे रक्षण करावे. (५७–५८)

उद्धव उवाच

यथैवमनुबुध्येयं(वँ), वद नो वदतां(वँ) वर ।
सुदुः(स्)सहमिमं(म्) मन्ये, आत्मन्यसदतिक्रमम् ॥ 59॥

उद्धव म्हणाला – भगवन्! हे ज्ञान घेण्यात आपणच कुशल आहात. दुर्जनांची अशी कृत्ये मला मुळीच सहन होत नाहीत. म्हणून मला अशा रीतीने हे सांगा की, जेणेकरून मी हे आचरणात आणू शकेन. (५९)।

विदुषामपि वि*श्वात्मन्, प्रकृतिर्हि बलीयसी ।
ऋते त्व*द्धर्मनिरतान्, शान्तां(म्)स्ते चरणालयान् ॥ 60॥

हे विश्वात्मन्! जे आपल्या चरणांना शरण आलेले असून भागवत धर्माच्या आचरणात कायम मग्न असतात, अशा शांतचित्त लोकांशिवाय अन्य कोणाही विद्वानांसुद्धा स्वभाव बदलता येत नाही. (६०)

इति* श्रीम*द्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)
सं(म्)हितायामेएकादश*स्क*न्धे द्वाविं(म्)शोऽध्यायः॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुद*च्यते
पूर्ण*स्य पूर्णमादाय पूर्णमेवावशि*ष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥

